कै.रेवन्नाथ कारभारी चेमटे ,उपाध्यापक
जि.प.प्रा.शाळा यांचे विरुद्ध सुरु
असलेल्या शिस्तभंग विषयक कारवाई
बाबत अंतिम निर्णय घेणे बाबत.

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग प्राथमिक
जि.प.आदेश क्र.कार्या-2/खाचौद/ 445 /2022
अहमदनगर दि.12/12/2022

वाचा :- 1) या कार्यालयाकडील निलंबन आदेश कार्या1/पीबीएस/501/2012,दिनांक 13/06/2012
2) या कार्यालयाकडील दोषारोप क्रमांक कार्या2/डिई/516/2012, दिनांक 11/09/2012
3) या कार्यालयाकडील सेवेत पुनःस्थापित आदेश कार्या2/डिई/953/2013 दि.19/11/2013
4) मा.सहा.आयुक्त (चौकशी) नाशिक यांचा अहवाल दि.30/05/2014
5) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पारनेर यांचेकडील पत्र क्रमांक अस्था-2/951/2022 दि.05/09/2022.
6) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) (सुधारणा) नियम 1979 मधील नियम13(चार)
7) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील परिपत्रक क्रमांक डिईएन-1006/प्रक्र.546आ-12 दि.04 जुलै 2006
8)म.ना.सेवा (पदग्रहण अवधी ,स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम 72(2)

कै.श्री. रेवन्नाथ कारभारी चेमटे,उपाध्यापक जि.प.प्राथमिक शाळा लाखेवस्ती येथे कार्यरत असताना त्यांनी बनावट अपंगत्वाचे प्रमाणपत्र प्रशासनास सादर करुन अनियमितता केली असल्याने त्यांचे विरुद्ध प्रशासकीय कारवाई करणेकामी संदर्भ क्रमांक 1 नुसार दोषारोप परिशिष्ट 1 ते 4 प्रमाणे बजावणेत आले आहेत. उक्त दोषारोपांस कै.श्री.रेवन्नाथ कारभारी चेमटे,यांचे विरुद्ध प्रस्तावित करण्यात आलेले आरोप अमान्य केलेने प्रकरणी सखोल चौकशी होणेकामी सहाय्यक आयुक्त (चौकशी),नाशिक विभाग नाशिक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.तथापि दि.30/05/2014 अन्वये सदरचा विभागीय चौकशीचा अहवाल प्राप्त झालेला आहे. सदरचे चौकशी अहवालात कै.श्री.रेवन्नाथ कारभारी चेमटे यांचेवरील 03 दोषारोप सिद्ध होत नसले बाबतचे निष्कर्ष प्राप्त झालेले आहेत.

गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पारनेर यांचेकडील संदर्भ क्रमांक 5 चे अन्वये कै.श्री. रेवन्नाथ कारभारी चेमटे, उपाध्यापक यांचे मृत्यु प्रमाणपत्र सादर करुन श्री.रेवन्नाथ कारभारी चेमटे हे दि. 23/09/2014 रोजी मयत झाले असले बाबत कळविणेत आलेले आहे.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दि.04 जुलै 2006 चे परिपत्रकानुसार शिस्तभंग विषयक कारवाई प्रलंबित असताना जि.प.कर्मचाऱ्याचा मृत्यु झाल्यास संबंधीत कर्मचाऱ्यांची शिस्तभंगाची कारवाई संपुष्टात आणणेची तरतुद आहे सबब शासन परिपत्रकामधील तरतुदीनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा

परिषद अहमदनगर कै.श्री.रेवन्नाथ कारभारी चेमटे, उपाध्यापक यांचे विरुद्ध संदर्भ क्रमांक 02 नुसार सुरु असलेली शिस्तभंगविषयक कारवाई या आदेशान्वये बंद करीत आहे.

तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी ,स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम 72(2) नुसार जर निलंबीत शासकीय कर्मचारी त्यांच्या विरुद्ध सुरू करण्यात आलेली शिस्तभंगाची कारवाई किंवा न्यायालयीन कार्यवाही समाप्त होणेपुर्वी मरण पावला तर निलंबनाचे कालावधी हा सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणुन मानण्यात येईल अशी तरतुद आहे त्यामुळे कै.श्री.रेवन्नाथ कारभारी चेमटे,उपाध्यापक यांचा दि.20/06/2012 ते दि.21/11/2013 अखेरचा निलंबन कालावधी सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ सेवाकालावधी म्हणुन धरणेत येत आहे.कै.श्री.रेवन्नाथ कारभारी चेमटे यांना निलंबन कालावधीत जेवढे वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क त्यांना आत्ता तेवढे पुर्ण वेतन व भत्ते त्यांच्या कुटुंबाला देण्यात येतील.मात्र कै.श्री.रेवन्नाथ कारभारी चेमटे यांना निलंबन कालावधीत देण्यात आलेली निर्वाह भत्त्याची रक्कम त्यातून समायोजित करण्याचे आदेश देणेत येत आहे.

सदर आदेशाची नोंद कै.श्री.रेवन्नाथ कारभारी चेमटे यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संकेतांक 20221212160190 असा आहे.

(आशिष येरेकर भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पारनेर

2/- सदरचा आदेश संबंधीत वारस पत्नी श्रीम. राधा रेवन्नाथ चेमटे यांना बजावून त्यांची दिनांकीत पोहच या कार्यालयास सादर करावी तसेच त्यांचे कुटुंब निवृत्ती वेतनाबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

(आशिष येरेकर भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर